# दत्त

## अनुक्रमणिका

( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ( मुद्दे.) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )


— मनोगत ७

— ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य ९

— 'सूक्ष्म' या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ ११

— दत्ताच्या चित्रांमागील आध्यात्मिक दृष्टीकोन १२

१. अर्थ १३

२. इतर काही नावे (अवधूत, दिगंबर, दत्तात्रेय) १३

३. जन्माचा इतिहास १४

३ अ. पुराणांनुसार १४

३ आ. अध्यात्मशास्त्रानुसार १५

४. दत्ताचे गुरु आणि उपगुरु १५

४ अ. गुरु (पृथ्वी, वायू, आकाश, पाणी, कपोत इत्यादी २४ गुरु) १५

४ आ. उपगुरु २३

४ आ १. वृक्ष २३

४ आ २. पर्वत २४

४ आ ३. कासव २५

इ. निरनिराळे गुरु करावे का ? (आत्मज्ञानप्राप्तीसाी एकच गुरु पुरे आणि चराचरातील वस्तूंमध्ये आत्मैक्य पहाण्यासाठी अन् मायेतील विविध गोष्टी कौशल्याने करता येण्यासाठी विविध गुणगुरु आवश्यक) २५

५. कार्य आणि वैशिष्ट्ये २६

६. अवतार २७

७. परिवाराचा भावार्थ २७

८. मूर्तीविज्ञान २७
९. सात्त्विक चित्र आणि नामजप-पट्टी २८
९ अ. सनातन-निर्मित दत्ताचे सात्त्विक चित्र २९
९ आ. सनातन-निर्मित ‘दत्ताची सात्त्विक नामजप-पट्टी’ ३१
१०. उपासना ३३
११. दत्तसंप्रदाय ५२
११ अ. नाथसंप्रदाय ११ आ. महानुभावसंप्रदाय ५२
११ इ. चैतन्यसंप्रदाय ११ ई. आनंदसंप्रदाय ५३
११ उ. श्रीपाद श्रीवल्लभ आणि श्री नृसिंह सरस्वती संप्रदाय ५३
११ ऊ. इतर ५५
१२. प्रमुख तीर्थक्षेत्रे ५५
१३. प्रमुख ग्रंथ ५७
१३ अ. दत्तपुराण १३ आ. अवधूतगीता ५७
१३ इ. विठ्ठल अनंतसुत कावडीबोवाकृत ‘श्री दत्तप्रबोध’ ५७
१३ ई. श्री गुरुचरित्र ५७
– दत्ताविषयीचे सूक्ष्म स्तरावरील अध्यात्मशास्त्रीय ज्ञान ५८

# मनोगत

बहुतेक दत्तभक्तांना दत्ताविषयी जी अल्पस्वल्प माहिती असते, ती बहुधा त्यांनी वाचलेल्या किंवा ऐकलेल्या कथांमुळे असते. अशा अल्प माहितीमुळे त्यांचा दत्तावरचा विश्वासही थोडा-फारच असतो. दत्ताविषयी जास्त माहिती मिळाल्यास जास्त विश्वास निर्माण होण्यास साहाय्य होते आणि त्यामुळे साधनाही चांगली होते. आध्यात्मिक उन्नतीसाठी ‘पिंडी ते ब्रह्मांडी’ असा प्रवास करायचा असतो. म्हणजे ‘ब्रह्मांडात’, म्हणजे शिवात, जी तत्त्वे आहेत ती ‘पिंडात’, म्हणजे जिवात, यायला हवीत. तरच तो जीव शिवाशी एकरूप होऊ शकतो. पाण्याच्या थेंबात तेलाचा थोडासाही अंश असल्यास तो पाण्याशी एकरूप होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे दत्तभक्तात दत्ताची सर्व वैशिष्ट्ये असल्याविना तो दत्ताशी एकरूप होऊ शकणार नाही; म्हणजेच त्याला सायुज्य मुक्ती मिळणार नाही. यासाठी या ग्रंथात प्रायः दत्ताविषयी इतरत्र बहुधा न दिलेली, पण उपयुक्त अशी पुढील अध्यात्मशास्त्रीय माहिती दिली आहे - दत्त, अवधूत, दिगंबर यांसारख्या नावांचा भावार्थ, दत्ताने केलेले गुणगुरु आणि साधकाने तसे गुणगुरु करण्याचे महत्त्व, दत्ताची कार्ये आणि वैशिष्ट्ये, दत्ताच्या परिवाराचा भावार्थ, मूर्तीविज्ञान, अतृप्त पूर्वजांच्या त्रासांपासून रक्षण होण्यासाठी दत्ताची उपासना करण्याची आवश्यकता आणि ती कशी करावी इत्यादी.

ही अध्यात्मशास्त्रीय माहिती दत्तभक्तांना आणि दत्ताची सांप्रदायिक साधना करणाऱ्यांना उपयुक्त ठरेल; परंतु सर्वसाधारण व्यक्तीने यासंदर्भात पुढील नियम लक्षात ठेवावा. श्री गणपति अथर्वशीर्ष वाचल्यावर श्री गणपतीची, शिवलीलामृत वाचल्यावर शिवाची आणि देवीमाहात्म्य वाचल्यावर देवीची उपासना करावी, असे काही जणांना वाटते. त्याच प्रकारे या ग्रंथातील दत्ताविषयीची माहिती वाचून आपणही दत्ताची उपासना लगेचच चालू करावी, असे त्यांना वाटण्याची शक्यता आहे. अशा व्यक्तींनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, दत्तासारख्या देवतेच्या उपासनेने सगळ्यांचीच आध्यात्मिक उन्नती शीघ्र होत नाही; कारण तिची उपासना करणे त्यांना आवश्यक असले, तरच त्या उपासनेचा जास्त लाभ होतो अन्यथा भरपूर साधना करूनही फारच थोडी प्रगती होते. दत्तासारख्या देवतेची उपासना करणे आवश्यक आहे कि नाही, हे सर्वसाधारण मनुष्याला कळत नाही, तर अध्यात्मदृष्ट्या उन्नत असलेलेच सांगू शकतात; म्हणून सर्वसाधारण मनुष्याने केवळ माहिती म्हणूनच हा ग्रंथ वाचावा. दत्ताची अनुभूती येण्याच्या दृष्टीने साधनेचा पहिला टप्पा म्हणून आपल्या कुलदेवतेच्या नावाचा ‘श्री... (कुलदेवी / कुलदेव यांच्या नावाचा चतुर्थीचा प्रत्यय)... नमः ।’ या पद्धतीने नामजप करावा. त्याच्याच जोडीला अतृप्त पूर्वजांच्या त्रासांपासून रक्षण होण्यासाठी

त्रासाच्या तीव्रतेनुसार दत्ताचा २ ते ६ घंटे (तास) नामजप प्रतिदिन करावा.

या ग्रंथात दिलेल्या काही अनुभूतींमध्ये 'प.पू. डॉक्टर' असा उल्लेख आलेला आहे, तो संकलकांपैकी प.पू. डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्याविषयी आहे.

हा ग्रंथ वाचून दत्तभक्तांची दत्तावरील श्रद्धा अधिक दृढ होवो आणि प्रत्येकालाच अधिकाधिक साधना करण्याची प्रेरणा मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. **- संकलक.**

('अध्यात्मशास्त्र' या ग्रंथमालिकेतील सर्व खंडांचे 'भाग १ आणि २' यांचे सामायिक मनोगत 'भाग १. प्राथमिक स्तरावरील अध्यात्मशास्त्र - खंड १. धर्म' यात दिले आहे.)